# मनोरमा मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर

ए-१४२, इंदिरा नगर, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४.
नोंदणी क्र. MSCS/CR/420/2011 Dt. 13.06.2011
Email : manoramamultistateheadoffice@gmail.com, Website : www.manoramamultistate.com

## १३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

मनोरमा मल्टिस्टेट को -ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, **रविवार, दि.२५ /०८/२०२४ रोजी ठीक दुपारी १२.३० वाजता मनोरमा भवन, पहिला मजला मिटींग हॉल, नवीन आर.टी.ओ. ऑफिस समोर, बेन्नूर नगर, विजापूर रोड, सोलापूर** येथे संपन्न होणार आहे, तरी सदर सभेस सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करवे ही विनंती.

### सभेपुढील विषय

१. सभेच्या अध्यक्षांची निवड करणे.
२. दि. १७-०९-२०२३ ची वार्षिक सर्वसाधारण सभा व दि. ०५ /०३/२०२४ ची विशेष सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
३. दि. ३१.०३.२०२४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल , लेखापरीक्षकाने प्रमाणित केलेला ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रक वाचून मंजूर करणे व सन २०२२- २३ चे वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचा दोषदुरुस्ती अहवाल मंजुरीसाठी ठेवणे.
४. सन २०२३-२०२४ ची नफा वाटणी मंजुरीसाठी ठेवणे व संचालक मंडळाने जाहीर केलेला लाभांश मंजुरीसाठी सादर करणे.
५. सन २०२३-२०२४ या सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२४-२५ या वर्षाकरिता मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या खर्च व उत्पन्नाचा अंदाजपत्रकास मंजुरीसाठी सादर.
६. संस्थेच्या सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरीक्षक व वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे व मानधन ठरविणे.
७. सन २०२३-२०२४ मधील संचालक मंडळाच्या मासिक सभा, गुंतवणूक सभा, कर्ज कमिटी सभा, एक्झ्युक्युटीव्ह सभा, इतिवृत्तांना मंजुरी देणे.
८. संस्थेच्या शाखा इतर ठिकाणी स्थलांतरित केलेल्या शाखांना मान्यता देणे व नवीन प्रस्तावित शाखा मंजुरीसाठी सादर.
९. संस्थेने खरेदी केलेल्या जागांपैकी काही जागा इतर संस्था अथवा बँकांना भाड्याने देणे अथवा खुल्या जागेवर केलेल्या बांधकामासह विक्री करणेबाबत **निर्णय घेणे**.
१०. संस्थेने २०२३-२०२४ मध्ये खरेदी केलेल्या स्थावर जंगम मालमत्तेस मंजुरीसाठी सादर तसेच सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात स्थावर जंगम मालमत्ता खरेदी अथवा विक्री करणे संबंधी संचालक मंडळांना अधिकार देणेबाबत मंजुरीसाठी सादर.
११. निर्लेखन प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.
१२. पोटनियम दुरुस्ती करणेस परिशिष्ट सूचीनुसार मंजुरीस सादर (परिशिष्ट 'A')
१३. स्थावर व जंगम मालमत्ता खरेदी केलेल्या जागेसंबंधी संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयास मान्यता देणे.
१४. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : ०९/०८/२०२४**

मनोरमा मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी Reg.No. MSCS/CR/420/2011 सोलापूर

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
**सौ. कविता कमलाकर कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सूचना :**

१. गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्या तासानी त्याच ठिकाणी सभा घेण्यात येईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. सन २०२३-२०२४ या वर्षीचा वार्षिक अहवाल ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आला आहे.
३. ज्या सभासदांना या संदर्भात काही लेखी सूचना द्यावयाच्या असतील त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसांत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेमध्ये संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य कार्यालय, यांच्याकडे लेखी द्याव्यात. मुदतीनंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.
४. www.manoramamultistate.com या वेबसाईटवर वार्षिक सर्वसाधारण सभेचा अजेंडा, नफा-तोटापत्रक , ताळेबंद पत्रक प्रकाशित केलेला आहे.